महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

Rs.2/-

गुरुवार ❖ ०५ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६० ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

गुरुवार ❖ ०५ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६० ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्याचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच !

## विधीमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

मुंबई : राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली असून भाजपाच्या बैठकीत हा ठराव करण्यात आला. भाजपाच्या अनेक नेत्यांनी त्यांच्या नावाला अनुमोदन दिलंय. ते विदर्भातील पाचवे व नागपूरचे दुसरे मुख्यमंत्री ठरतील.

फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या दरम्यान पूर्ण पाच वर्षासाठी मुख्यमंत्री राहिल्यानंतर २०१९मध्ये औटघटकेचे मुख्यमंत्रीपद वगळता ते पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत.

नगरसेवक, महापौर, विरोधीपक्षनेते, उपमुख्यमंत्री आणि आता पुन्हा मुख्यमंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द आहे. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्री, विरोधीपनेते, उपमुख्यमंत्री अशी तिन्ही महत्वाची पदे भूषविली होती. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार सत्तेवर विराजमान होणार आहे. या नव्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार आहेत. मुख्यमंत्री पदाच्या चर्चेकरता केंद्रीय निरिक्षक आज मुंबईत आले. निर्मला सीतारामण आणि विजय रुपाणी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव ठरला. तर उर्वरित भाजपाच्या आमदारांनी देवेंद्र फडणवीसांच्या नावावर अनुमोदन दिलं. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला सत्तास्थापनेचा तिढा अखेर सुटला आहे.

## भाजपकडून महत्त्वाच्या नेत्यांना शपथविधीचे निमंत्रण

- योगी आदित्यनाथ - मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश
- चंद्राबाबू नायडू - मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश
- नितीन कुमार - मुख्यमंत्री, बिहार
- प्रेमा खांडू - मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश
- हिमंत बिश्व शर्मा - मुख्यमंत्री, आसाम
- विष्णूदेव साय - मुख्यमंत्री, छत्तीसगढ
- प्रमोद सावंत - मुख्यमंत्री, गोवा
- भूपेंद्र पटेल - मुख्यमंत्री, गुजरात
- नायब सिंग सैनी - मुख्यमंत्री, हरियाणा
- मोहन यादव - मुख्यमंत्री, मध्य प्रदेश
- कॉनराड संगमा - मुख्यमंत्री, मेघालय
- भजनलाल शर्मा - मुख्यमंत्री, राजस्थान
- मानिक साहा - मुख्यमंत्री, त्रिपुरा
- पुष्कर सिंग धामी - मुख्यमंत्री, उत्तराखंड
- नामदेव शास्त्री, भगवानगड
- राधानाथ स्वामी महाराज, इस्कॉन
- गौरांगदास महाराज, इस्कॉन
- जनार्दन हरीजी महाराज
- प्रसाद महाराज अंमळनेरकर
- मोहन महाराज
- जैन मुनी लोकेश



## निर्मला सीतारमण यांच्या उपस्थितीत बैठक

मुंबईः भाजपच्या केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत कोअर कमिटीची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये देवेंद्र फडणवीसांचं नाव विधीमंडळ गटनेता म्हणून निश्चित झालं आहे. त्यामुळे गुरुवारी राज्याचे नवीन मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस शपथ घेतील. भाजपची कोर कमिटीची बैठक आज संपली निर्मला सीतारमण यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. विधिमंडळ नेत्यांच्या बैठकीला काहीच क्षणांमध्ये सुरुवात होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली बैठक. याच बैठकीत गटनेता म्हणून फडणवीसांची निवड झाली. देवेंद्र फडणवीसांचं नाव मुख्यमंत्री म्हणून भाजपने जवळपास निश्चित केलं होतं. परंतु एकनाथ शिंदे यांच्या कथित नाराजीमुळे भाजपने त्यांचं नाव जाहीर केलेलं नव्हतं. शेवटी शिंदेंनी गृहमंत्री पदाची मागणी लावून धरली होती. त्याबाबत भाजप काय निर्णय घेणार, हे लवकरच कळेल. मात्र मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हेच शपथ घेतील, हे निश्चित झालं आहे.

**लाडक्या बहिणींच्या साक्षीने शपथविधी होणार**

महायुतीचे सरकार सत्तेवर विराजमान होण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'लाडक्या बहिणी' शपथविधीला उपस्थित राहणार आहेत. शपथविधीच्या ठिकाणी 'लाडकी बहीण कक्ष उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी १० हजार महिलांची बसण्याची व्यवस्था केली आहे. सोहळयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना आमंत्रण देण्यात आलेलं आहे.

## शपथविधिबाबत 'शिंदेंचा सस्पेन्स'कायम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

मुंबई : राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आज १२ दिवस झाले. त्यानंतर मुख्यमंत्री पदाचा पेच आज अखेर सुटल्याचं चित्र आहे. महायुतीतील भाजपने आज मुख्यमंत्रीपदासाठीचं नाव जाहीर झालं आहे. आज भाजपने अखेर मुख्यमंत्री पदाचं आणि विधीमंडळाच्या नेतेपदी एकमताने निवड झाली आहे. त्यामुळे आता शपथविधीचा काउंटडाऊन सुरू झाला आहे. उद्या (गुरूवारी) ५ डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर महायुतीच्या मुख्यमंत्र्यांचा आणि इतर मंत्र्यांच्या शपथविधी सोहळा पार पडणार आहे. मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीनंतर राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस काम पाहतील.

दरम्यान, महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची महायुतीच्या नेत्यांनी भेट घेतली. भाजप नेते देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी सत्ता स्थापनेचा दावा केला. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. राज्यपालांची भेट घेतल्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद पान ४ वर ▶▶

### शिंदे यांनी नेतृत्व करावं सेनेच्या आमदारांचा सूर

संध्याकाळपर्यंत थांबा तुम्हाला सगळं कळेल. त्यामुळे राज भवनातील पत्रकार परिषदेतून एकनाथ शिंदे यांची शपथ विधिबाबत कोणतेही स्पष्टता दिलेली नाही. त्यामुळे आता याच मुद्यावरून एकनाथ शिंदे यांची समजूत काढण्यासाठी शिंदे सेनेचे अनेक आमदार वर्षा या त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले आहे. एकनाथ शिंदे यांनी राज्याचे नेतृत्व करावं , असा सर्व शिवसेनेच्या आमदारांचा सूर असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता शिंदे नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## 'शेतकरी ते थेट डोंबिवलीकर' उपक्रमाचे रवींद्र चव्हाण यांच्याकडून कौतुक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : आमदार रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून कृषी विभाग आत्मा व कृषी पणन पुरस्कृत विंग्रो फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि., डोंबिवलीकर प्रतिष्ठान आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवलीत विविध ठिकाणी आठवडी बाजार भरवण्यास सुरुवात झाली आहे.

दर गुरुवारी रिजन्सी इस्टेट, बिल्डिंग नं. २२ जवळ, दर शुक्रवारी ठाकुर्लीतील म्हसोबा चौक, ९० फिट रोड येथे; दर शनिवारी रिजन्सी अनंतम कॉम्प्लेक्सच्या मेन गेट जवळ आणि दर रविवारी डोंबिवली पूर्वेतील नेहरू मैदान येथे हा दुपारी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत आठवडी बाजार भरवण्यात येत आहे.



बऱ्याचदा शहरातल्या मार्केटमध्ये जो भाजीपाला मिळतो, तो रासायनिक खतं आणि औषध फवारणी केलेला असतो. त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका असतो. मात्र या आठवडी बाजाराच्या माध्यमातून डोंबिवलीकरांना शेतात पिकणारा नैसर्गिक आणि विषमुक्त ( रेसिड्यू फ्री ) ताजा माल थेट डोंबिवलीत विकत मिळत आहे. यामध्ये सर्व प्रकारचा, विशेषतः सेंद्रिय व विषमुक्त भाजीपाला, फळे, धान्य, कडधान्य इ. शेतमाल रास्त दरात मिळत आहे.

या उपक्रमामुळे डोंबिवलीकरांना रास्त दरात उत्तम दर्जाचा माल उपलब्ध होत आहे. त्यामुळे डोंबिवलीकरांचे आरोग्य जपण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असंच म्हणावं लागेल. पण त्याजोडीनेच दलाल-अडते यांचा कोणताही हस्तक्षेप नसल्याने शेतकऱ्यांना देखील अधिकचा भाव मिळत आहे अशा रीतीने डोंबिवलीतील हा आठवडी बाजार दुहेरी फायद्याचा ठरत आहे. रविंद्र चव्हाण यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले की 'शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे तसेच कृषी क्षेत्रातील दलाल-अडते यांचे महत्त्व कमी करणे यावर पान ४ वर ▶▶

## महायुतीच्या नव्या सरकारमध्ये तीन भ्रष्ट मंत्र्यांना मिळणार डच्चू ?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यामध्ये सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. उद्या राज्याचे नवे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत काही मंत्र्यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. या शपथविधी सोहळ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुतीच्या नव्या सरकारमध्ये स्वच्छ चारित्र्याचे आणि भ्रष्ट्राचाराचे आरोप असणाऱ्या माजी मंत्र्यांना डच्चू मिळणार असल्याची माहिती समोर आली



आहे. एकनाथ शिंदे यांच्या ३ मंत्र्यांना नव्या सरकारच्या मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची शक्यता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महायुतीच्या नेत्यांना नव्या मंत्री मंडळात स्वच्छ चेहऱ्यांच्या आणि भ्रष्ट्राचाराचे आरोप असणाऱ्या माजी मंत्र्यांचा समावेश न करण्याचे आदेश पान ४ वर ▶▶

## ✍ संपादकीय

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी आपले मनःपूर्वक अभिनंदन!!

**– रवींद्र घोडविंदे**

महाराष्ट्र राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी फडणवीस हे आज पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या उपस्थितीत शपथ घेत आहेत. त्यांचे दैनिक जीवनदीप वार्ता कडून मनःपूर्वक अभिनंदन. या नेत्याने पुन्हा एकदा दाखवून दिले मी दिलेला शब्द पूर्ण केला. राज्यातील मास लीडर एक राजकीय ' चाणक्य 'असल्याचे त्याने दाखवून दिले आहे.

**मेरा पानी उतरता देख कर,**
**मेरे किनारे पर घर मत बसा लेना।**
**मैं समंदर हूँ, लौटकर फिर आऊँगा'**

हे वाक्य त्यांनी सिद्ध करून दाखवले.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा युतीला बहुमत मिळवून ही देवेंद्र फडणवीसांना विरोधी पक्षात बसावं लागलं. त्यावेळी विरोधी पक्षनेता म्हणून भाषण करताना देवेंद्र फडणवीस असे म्हणाले आहेत. आता हेच शब्द आज फडणवीसांनी सत्यात उतरवून दाखवले.

तरुण मुख्यमंत्री म्हणून त्यांनी सन २०१४ ते २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी केलेले काम उल्लेखनीय होते. मुख्यमंत्री पदाची आलेली संधी सोडताना त्यांची काय अवस्था झाली असेल. इतकेच नव्हे तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत काम करताना १०६ आमदार असूनही उपमुख्यमंत्री म्हणून काम करावे लागले तेव्हाची त्यांची मानसिक घाल मेल अवघ्या महाराष्ट्र राज्यांनी पहिली.प्रशासकीय कामाचा व अचूक निर्णय घेण्याचा त्यांचा अभ्यासू स्वभाव यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने भरघोस यश मिळविले आहे.

परंतु प्रचंड जिद्द, तितकाच संयम आणि काम करताना हाती असणारे विश्वासू सहकारी याच्या जोरावर या नेत्याने स्वतःला कामात झोकून दिले. आपल्या राजकीय डावपेचाच्या जोरावर ते आज ही विरोधकांना पुरून उरले आणि राजकारणाच्या सारीपाटावर पुन्हा झळाळून उभे राहिले आहेत.

'मी पुन्हा येईन'' असं म्हणणारे देवेंद्र फडणवीस पुन्हा आलेच . ते घासून नव्हे ठासून आलेत. आज त्यांचा मुख्यमंत्री पदाचा शपथविधी होईल ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतीलच.

अभ्यासू नेता , कुशल वक्ते, आदर्श नेतृत्व, अनेक विषयांचा सखोल अभ्यास, सर्व गुण सपन्न नेतृत्व म्हणून त्यांची ओळख राज्याच्या राजकारणात आज आहे.त्यांनी राज्याच्या राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

युवा राजकारणी म्हणजे देवेंद्र फडणवीस. नगरसेवक ते कमी वयातील महापौर, आमदार भाजपा प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, उपमुख्यमंत्री अशी पदे त्यांनी सांभाळली आहेत.

गेली दीड दशक देवेंद्र फडणवीस हे नाव राज्याच्या राजकीय सारिपाटावर चांगलंच चर्चेत आहे. निष्कलंक, चारित्र्यसंपन्न आणि आपल्या कामाप्रती प्रामाणिकता, जोपसणारा हा लोकनेता गेली अर्धदशक पूर्णपणे महाराष्ट्राच्या राजकारणाचा आणि सत्ताकारणाचा एकमेव केंद्रबिंदू ठरला होता.आनेक वादळ घोगावत त्यांना घेरण्यासाठी उठली मात्र संयमी स्वभावाने त्यांनी त्यावर मात केली. त्यांचा शांत, संयमी, व वेळेवर आक्रमक ठरणारा स्वभाव तसेच प्रत्येक आयुध कसे परतवून लावायच हे संघ शिक्षण त्यांनी उपयोगात आणले ; आणि मी पुन्हा येईन, पुन्हा येईन हे म्हणत म्हणतं ते पुन्हा आले आहेत, राज्याच्या सर्वांगीन प्रगतीसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!!

## विकासाचे वादळ आमदार किसन कथोरे, यांना मंत्रीपद द्यावे

### वसत शेलवलीच्या सरपंचासह जनतेची मागणी!



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मुरबाड विधानसभा मतदारसंघातून सलग५वेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या आणि विकासाचे वादळ, विकास पुरुष, कार्यसम्राट अशा बिरुदावली ज्यांना शोभून दिसतात असे आमदार किसन कथोरे यांना महायुतीच्या सरकारने मंत्रीपद द्यावे अशी मागणी वसत शेलवली चे सरपंच रवींद्र सिताराम भोईर यांच्या सह संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून होत आहे.

गेली४वर्षे मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व आमदार किसन कथोरे हे करत आहेत, या वर्षात त्यांनी आतापर्यंत लाखोंचा विकास निधी आपल्या मतदारसंघात आणला आहे, प्रत्येक गाव, वाड्या वसत्या, शहरे या भागात त्यांनी विकास कामांचा डोंगर उभा केला आहे. त्यामुळे त्यांना विकास पुरुष, विकासाचे वादळ, कार्यसम्राट आमदार असे संबोधले जाते, यावेळी ते विकास कामांच्या जोरावर ५व्यांदा आमदार म्हणून भरघोस मतांनी निवडून आले, यावेळी त्यांच्या खांद्याला खांदा लावून कल्याण तालुक्यातील वसत शेलवली ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र भोईर हे प्रचार करत होते, त्यांनी आपल्या पान ४ वर ▶▶

## इगतपुरी- आमणे समृद्धी महामार्ग लवकरच सेवेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : सध्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे काम सुरू असून या टप्प्यामध्ये एकूण पाच बोगद्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. इगतपुरी ते आमने हा या मार्गावरील सर्वात महत्त्वाचा टप्पा असून, त्यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे इगतपुरी या ठिकाणी असणारा आठ किलोमीटर लांबीचा बोगदा आहे.

या बोगद्याचे सगळयात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा राज्यातील दुस-या क्रमांकाचा मोठा बोगदा असणार आहे. त्यामुळेच ठाणे ते नाशिक प्रवास करताना कसारा घाटातून आता प्रवास करावा लागणार नाही. याशिवाय, प्रवासात कसारा घाटदेखील टाळता येणार आहे. समृद्धी महामार्गाचे काम सध्या खूप वेगात सुरू असून जवळपास 'इगतपुरी ते आमने' या शेवटच्या टप्प्याचे काम सध्या सुरू आहे. या टप्प्याचे कामही पूर्ण होऊन या ठिकाणी नवीन वाहतूक सुरू होईल.



इगतपुरीवरून ठाणे किंवा आमने गाठायला फक्त सव्वा तास लागणार आहे आणि ठाणे ते नाशिक प्रवास फक्त अडीच तासांमध्ये पूर्ण करता येणार आहे ,असे 'एमएसआरडीसी'च्या सूत्रांनी सांगितले.

सध्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे काम सुरू असून या टप्प्यामध्ये एकूण पाच बोगद्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. इगतपुरी ते आमने हा या मार्गावरील सर्वात महत्त्वाचा टप्पा असून यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे इगतपुरी या ठिकाणी असणारा आठ किलोमीटर लांबीचा बोगदा होय. बारा किलोमीटरचा कसारा घाट असून तो पार करण्यासाठी एक तासांपेक्षा जास्त कालावधी लागतो. परंतु जेव्हा समृद्धी महामार्गाचा हा शेवटचा टप्पा सुरू होईल आणि या बोगद्याचे काम पूर्ण होईल. तेव्हा या बोगद्यातून अवघ्या आठ मिनिटांत इगतपुरी ते कसारा हे अंतर पार होणार आहे. आता हा ७६ किलोमीटरचा अंतिम टप्पा असून समृद्धी महामार्गावरील सगळयात मोठा आव्हानात्मक कामांचा हा टप्पा आहे. यामध्ये तब्बल १७ द-या असून आणि तब्बल १७ पूल या ठिकाणी उभारले जात आहेत. या सगळया पुलांची एकत्रित लांबी ११.५ किलोमीटर आहे.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाची स्थापना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(प्रतिनिधी) :**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१११४/प्र.क्र.७४९/ग्रं. क. दि.२८.११.२०२४ अन्वये पालघर येथे नवीन शासकीय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय स्थापन करण्यात येवून कार्यालयासाठी एकूण चार पदे मंजूर करण्यात आली आहेत.

सदर कार्यालयाचे उदघाटन आज रोजी करण्यात आले असून उदघाटन प्रसंगी डॉ. किरण सावे, प्राचार्य सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, प्रशांत भामरे नियोजन अधिकारी, मल्लिनाथ कांबळे, महिला बाल विकास अधिकारी, निलेश भागेश्वर, जिल्हा कृषी अधिकारी, प्रशांत पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, अमोल पाटकर, प्रकाशक, मनोविकास ग्रंथोत्सव, विद्या डाडर, गणेश किणी व कार्यालयातील इतर कर्मचारी तसेच वाचक वर्ग उपस्थित होते.या ग्रंथालय मार्फत मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य., शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथाल यांची स्थापना, बांधकाम व विकास., शासनमान्य सार्वजनिक / ग्रामपंचायत ग्रंथालयांना शासनमान्यता व सहायक अनुदान.तसेच पालघर जिल्हयातील वाचकांसाठी आवश्यक ती ग्रंथसंपदा सदर ग्रंथालयात उपलब्ध करुन देण्यात येईल. असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी सांगितले.

# इंडीयन मेडिकल असोसिएशनची नवीन कार्यकारणी जाहीर



## अध्यक्षपदी डॉ. महेंद्र मढवी तर सचिवपदी डॉ.मोहददीस मोमीन यांची निवड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता भिवंडी(प्रतिनिधी) :**
इंडीयन मेडिकल असोसिएशन भिवंडी शाखेची सन (२०२४ ते २०२६) या दोन वर्षांसाठी नवीन कार्यकारणीची निवड रविवार दिनांक १/१२/२०२४ रोजी ३/६/२०१२ साली उद्घाटन झालेल्या सुसज्ज अशा इंडीयन मेडिकल असोसिएशन सभागृह सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स दुसरा मजला टेमघर कल्याण रोड येथे शेकडो सभासदांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी डॉ.श्री. महेंद्र महादेव मढवी,सचिव पदी डॉ.श्री.मोहददीस मोमीन, तर खजिनदार पदी डॉ.श्री.गुलाम. एम.मारफानी यांची सर्वांनुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या विशेष वार्षिक बैठकीसाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंडीयन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.श्री.संतोष कदम,भिवंडी लोकसभेचे खासदार श्री. सुरेश गोपीनाथ म्हात्रे उर्फ बाळया मामा,आयपीएस अधिकारी तथा पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई डॉ.श्री. रवींद्र शिसवे,आदी मान्यवर व मोठ्या संख्येने इंडीयन मेडिकल असोसिएशन (IMA) शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.इंडीयन मेडिकल असोसिएशन (IMA) शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.श्री. महेंद्र महादेव मढवी,सचिव डॉ.श्री.मोहददीस मोमीन, तर खजिनदार डॉ.श्री.गुलाम. एम. मारफानी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देताना उपस्थित मान्यवरांनी सांगितले की,तुमच्यावर विश्वास ठेवून तुम्हाला या सर्वांनी बिनविरोध निवडून दिले आहे, यांच्या विश्वासाला पात्र ठरेल असे काम तुम्ही करावे जेणेकरून तुमचा सर्वांना अभिमान वाटेल.सर्वप्रथम मी आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो.कारण तुमच्या सर्वाच्या सहकार्यामुळेच आम्ही पदाधिकारी म्हणून अध्यक्ष,सचिव व खजिनदार या पदाची सुत्रे हाती घेतली आहेत. त्यामुळे तुम्हा सर्वांना सोबत घेऊन आपल्या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून आपल्या व्यवसायातील समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू असे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.श्री. महेंद्र महादेव मढवी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले.या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनिका अन्सारी व डॉ.गुलाम मारफानी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.श्री.झकी बेलारी यांनी केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# मुरबाडमधील चासोले वाकलवाडी खुटल बारागाव रस्त्यावरील काळु नदीवरील पूल दुर्लक्षित



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी) :**
मुरबाड तालुक्यातील सह्याद्री पर्वताच्या पर्वत रांगेतील दुर्गम भाग समजल्या जाणाऱ्या खुटल बारागाव व पुढे न्याहाडी गावाजवळून वाहणाऱ्या काळू नदीवरील कमी उंचीचा पूल आहे.

या ठिकाणी नवीन पूल बांधावा अशी मागणी या भागातील जनतेकडून गेल्या अनेक वर्ष होत आहे पावसाळयामध्ये काळू नदीला मोठा पूर आल्यावर हा पुल पाण्याखाली जातो व त्यामुळे या भागातील नागरिकांचे वाहन चालकांचे दळणवळण यंत्रणा ठप्प होते त्यामुळे या ठिकाणी मोठा पूल बांधावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.हा रस्ता पुढे सलग्न होऊन घाटाकडे जातो त्यामुळे ह्या ठिकाणी मोठा पूल बांधावा व या भागातील स्थानिकांची दळणवळणासाठी गैरसोय दूर करावी अशी मागणी माजी सरपंच शंकर हेमा सोंगाळ यांनी दिली आहे.

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्यकारिणी सभा संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता झिडके-अंबाडी(प्रतिनिधी) :**
माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य,भिवंडी तालुका कार्यकारिणी सभा नुकतीच तालुक्यातील अंबाडीनाका ' हरे राम,हरे कृष्ण' येथील सभागृहात महासंघाचे सरचिटणीस तथा पत्रकार विजय गायकवाड यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली.सदर सभेसाठी महासंघाचे तालुका अध्यक्ष शांताराम पाटील,उपाध्यक्ष नवसु पाटील,कार्याध्यक्ष शामराव भोईर तसेच कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य यांची उपस्थिती होती.

माहिती अधिकार या कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने देशात २००५ या वर्षांपासून सुरू झाल्यानंतर नागरिकांना विविध स्वरूपातील माहिती एका अर्जाद्वारे संबंधित सरकारी अथवा खाजगी क्षेत्रातील व्यक्ति,कार्यालय ठराविक दिवसांमध्येच देणे माहिती अधिकार कायद्याने बंधनकारक आहे.परंतु ग्रामीण भागातील नागरिकांना अद्याप ही या कायद्याबाबत अज्ञान असल्यामुळेच अनेक बाबतीत अप्रत्यक्षरित्या अन्याय होत असतात,फसवणूकी होत असतात. विशेषतःग्रामीण भागातील नागरिकांमध्ये माहिती अधिकार या कायद्याबाबत जनजागृती व्हावी आणि नागरिकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी ' माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य' स्तरावर हे संघटन प्रभावीपणे काम करीत आहे.या चळवळीला मोठ्या प्रमाणात बळकटी देण्याची काळाची गरज आहे,असे स्पष्ट मत पत्रकार तथा महासंघाचे सरचिटणीस विजय गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले आहे.यावेळेस उपस्थित सदस्यांकडून अनेक महत्त्वपूर्ण सुचना महासंघाच्या कार्याच्या दृष्टीकोनातून मांडून भविष्यात आपापल्या परीने महासंघासाठी योगदान देण्याची भूमिका व्यक्त केली,की जेणेकरून भिवंडी तालुक्यातील महासंघाचे कामकाज इतरांना मार्गदर्शक ठरावे.

अशाप्रकारे माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका कार्यकारिणी सभा अंत्यत सुनियोजनबद्ध पार पडली.

## अखेर डोंबिवली गोळवलीतील

# बेकायदा शुभारंभ हॉल भुईसपाट

### उच्च न्यायालयाच्या आदेशावरून पालिकेच्या 'आय' प्रभागाची उल्लेखनीय कारवाई..!

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता टिटवाळा(प्रतिनिधी) :**
डोंबिवली जवळील गोळवली गाव हद्दीतील शिळफाटा रस्त्यालगतचा शुभारंभ बॅन्क्वेट हॉल बाबत याचिका कर्त्या माहिती अधिकार कार्यकर्त्या प्रिती कुथे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय गडकरी व न्यायमूर्ती कमल खाता यांच्या आदेशावरून कल्याण-डोंबिवली पालिकेच्या आय प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन दिवसांच्या कारवाईत भुईसपाट केला. ग्रामपंचायतीला बांधकाम परवानगीचे अधिकार आहेत का, असा प्रश्न करत, न्यायालयाने गोळवली ग्रामपंचायतीच्या बांधकाम परवानगीचा आधार घेऊन उभारण्यात आलेले शुभारंभ हॉलचे बांधकाम बेकायदा आहे, असा निष्कर्ष नोंदविला.

हे बांधकाम बेकायदा असल्याने ते आपण स्वताहून तोडून घेता की आम्ही आदेश देऊ, असे प्रश्न न्यायालयाने पालिकेच्या वकिलांना केले. पालिकेचे वकील ॲड. संदीप शिंदे यांनी दोन दिवसात हे बेकायदा बांधकाम तोडण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले.

पालिकेच्या 'आय' प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी शनिवारी सुट्टी असुनही आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या आदेशावरून शुभारंभ हॉलवर कारवाई सुरू केली.

गोळवली गाव हद्दीत मदन गुप्ता यांच्या मालकीचा तीन माळयाचा वाणीज्य वापराचा शुभारंभ बॅन्क्वेट हॉल होता. हे बांधकाम बेकायदा असल्याच्या तक्रारी माहिती कार्यकर्त्या प्रीती कुथे यांनी पालिका आयुक्त ते 'आय' प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांकडे मागील दोन ते तीन वर्षांपासून केल्या होत्या. यापूर्वी दोन वेळा या बांधकामावर कारवाई झाली होती. सततचा पाठपुरावा करूनही पालिकेकडून कारवाई होत नसल्याने माहिती कार्यकर्त्या प्रिती कुथे यांनी ॲड. निखील वाजे, ॲड. वीरेन तपकीर यांच्या साहाय्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून, हे बेकायदा बांधकाम तोडण्याची मागणी केली होती.न्यायालयाने सर्व बाजू ऐकून हे बांधकाम बेकायदा असल्याचा निष्कर्ष काढून चार महिन्यापूर्वी हे बांधकाम तोडण्याचे आदेश पालिकेला दिले होते. त्यावेळी हॉल मालकाकडून काही आक्षेप घेण्यात आले होते.न्यायालयाने तोडकामाला अंतरिम स्थगिती दिली होती. शुभारंभ हॉलचे प्रकरण गेल्या आठवड्यात पुन्हा सुनावणीला आले.

न्यायालयाने शुभारंभ हॉलचा सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेला इमारत बांधकाम आराखडा सादर करण्याचे आदेश हॉल मालकाची बाजू मांडणाऱ्या वकिलांना दिले. गोळवली ग्रामपंचायतीने बांधकामाला मंजुरी दिल्याची ठरावाची प्रत न्यायालयाला दाखविण्यात आली.

न्यायालयाने ही परवानगी बोगस असल्याचा निष्कर्ष नोंदविला. त्यानंतर पालिकेच्या वकिलाने येत्या दोन दिवसात हे बांधकाम तोडण्यात येईल, असे आश्वासन न्यायालयाला दिले.साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी जेसीबी, तोडकाम पथकाच्या साहाय्याने बेकायदा हॉल तोडण्याची कारवाई शनिवारी सुरू केली. सोमवारी शक्तिमान कापकाम यंत्राच्या साहाय्याने शुभारंभ हॉल भुईसपाट करण्यात आला.




**सदर अनाधिकृत बांधकामाबाबत वारंवार तक्रारी केल्या. पण पालिका प्रशासनाकडून कारवाई होत नव्हती. म्हणून याचिका दाखल केली. अशा प्रकारची अनेक बांधकामे पालिका क्षेत्रात आहेत. त्यांच्या तक्रारी केल्या आहेत. कारवाई न झाल्यास याचिका दाखल करण्यात येईल.**
**- प्रिती कुथे माहिती अधिकार कार्यकर्ती**

**गोळवली ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगी घेऊन शुभारंभ हॉलची उभारणी करण्यात आली होती. हॉल मालक मदन गुप्ता या बनावट कागदपत्रांवर विसंबून होते, न्यायालयाने या बेकायदेशीर कृत्यावर टीका केली. न्यायालयाने हे बांधकाम बेकायदा असल्याचा निष्कर्ष नोंदविला. त्यामुळे हॉलवर कारवाई झाली.**
**-ॲड. निखील वाजे, याचिकाकर्ता वकील.**

**उच्च न्यायालयाने शुभारंभ हॉल बेकायदा असल्याचा आदेश दिल्याने, न्यायालयाच्या आदेशावरून आयुक्त, उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली हे बेकायदा बांधकाम भुईसपाट करण्यात आले.**
**- भारत पवार साहाय्यक आयुक्त,आय प्रभाग, कल्याण.**

# दिव्यांग विद्यार्थी तपासणी व मोजमाप शिबीर

## २२३ दिव्यांग विद्यार्थ्यांनी घेतला शिबीराचा लाभ



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**
ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग, समग्र शिक्षा व समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत शिक्षण उपायुक्त सचिन सांगळे यांचे मार्गदर्शना खाली शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी दिनांक २९ व ३० नोव्हेंबर २४ रोजी ठामपा शाळा क्र १७ कोपरी व शाळा क्र.६९ कळवा, ठाणे येथे सकाळी ९ ते ५ या वेळेत अल्मीको दिव्यांग विद्यार्थी तपासणी व मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सदर शिबिरामध्ये उपस्थित २२३ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करण्यासाठी शिवाजी हॉस्पिटल ठाणे येथून वैद्यकीय अधिकारी डॉ. हितेश पाटील,अस्थिरोग तज्ञ डॉ.जयनीत मालवीय, डॉ. योगी भोईर,तसेच अल्मीको संस्थेमार्फत गौरीश साळुंखे, तज्ञ संकेत देवलकर, ऑडिओ लॉ जिस्ट, मनुराज, रियास यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अस्थिव्यंग, कर्णबधिर, मेंदूचा पक्षघात, दृष्टी बाधित, मतिमंद मुलांची तपासणी व मोजमाप केले. सदर शिबिरासाठी गटप्रमुख संगीता बामणे, केंद्रप्रमुख, पालक उपस्थित होते.

# फास्टफुड आरोग्यास घातक



आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात.

जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**




०५ डिसेंबर २०२४
गुरुवार

**मेष**
घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ नका. आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ असणार आहे. कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते बाहेर जात असाल तर ते पूर्ण होईल.

**वृषभ**
फसवणूक होऊ शकते. तुमचे नुकसान होण्याची शक्यता दिसते.कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यात अडचणी येतील. सल्ला विचारपूर्वक पाळावा.

**मिथुन**
तुम्ही अध्यात्मिक कार्यात पुढे जाल आणि व्यवसाय करणारे लोक काही बदल करण्याची योजना आखू शकतात. आहारात, मसालेदार पदार्थ टाळा.

**कर्क**
प्रगतीच्या मार्गात येणारे अडथळे दूर केले जातील आणि तुमच्या मुलाच्या शिक्षणाशी संबंधित काही समस्या असतील तर त्या दूर केल्या जातील.

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी चिंताजनक असणार आहे. काही काम विचारपूर्वक करा, अन्यथा समस्या उद्भवू शकतात. कामे पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही चिंतेत असाल.

**कन्या**
नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ**
काही कामे पूर्ण न झाल्यामुळे तुम्हाला अडचणींना सामोरे जावे लागेल.दिवस तुमच्यासाठी आनंदाचा जाणार आहे. खास व्यक्तीला भेटण्याची संधी मिळेल.

**वृश्चिक**
घाईत कोणताही निर्णय घेतल्यास नुकसान होऊ शकते. दिवस चांगला जाणार आहे. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचा सन्मान वाढेल.

**धनु**
मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. लेखन कार्यातील अडचणी दूर होतील.

**मकर**
तुम्ही जे काही काम हाती घ्याल त्यात तुम्हाला नक्कीच यश मिळेल.आईच्या तब्येतीची काळजी घेणे आवश्यक आहे. वाद होऊ शकतात.

**कुंभ**
महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळू शकते. कुटुंबात काही वाद चालू असेल तर तो संपेल. दिवस तुमच्यासाठी कार्यात सहभागी होऊन नाव कमावण्याचा असेल.

**मीन**
महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. मान-सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल.

## 'शेतकरी ते थेट डोंबिवलीकर'...

पान ३ वरून ▶▶ आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी नेहमीच भर देत असतात. याच प्रेरणेतून उचललेले हे पाऊल आहे.'पोलीस, अमोल अहिरे - मीरा-भाईंदर पोलीस, सोनी भुरे - ठाणे शहर पोलीस, सोमनाथ हिंगमीरे-ठाणे ग्रामीण यांच्यासह विद्यार्थी विविध दलात तैनात झाले आहेत.

## नव्या सरकारमध्ये...

पान ३ वरून ▶▶ दिले आहेत. अशामध्ये शिवसेनेच्या ३ माजी मंत्र्यांना डच्चू मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेना आमदारांची धाकधूक वाढली आहे.

१) संजय राठोड माजी जलसंधारण मंत्री म्हणून सूमार कामगीरी. तसेच बंजारा समाजातील एका तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात गंभीर आरोप करण्यात आले होते.

२) अब्दूल सत्तार - माजी कृषी मंत्री आणि अल्पसंख्यांक मंत्री विभागांतर्गत कारभारात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे अनेक आरोप करण्यात आलेत. या आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती ही नेमण्यात आली आहे. ३) तानाजी सावंत - माजी आरोग्य मंत्री विभागात कामकाजात आर्थिक गैरव्यव्हाराचे आरोप करण्यात आलेत. तसेच पक्ष संघटनात्मक अनेक नाराजीच्या तक्रारी मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे अनेकवेळा आल्या आहेत.

## आमदार किसन कथोरे, यांना...

पान ३ वरून ▶▶ गावातून श्री कथोरे यांना मतांचे लीड दिलेच, शिवाय इतर भागातून देखील भरघोस मते मिळावी म्हणून प्रयत्न केले. या सर्वांच्या मेहनतीने व कष्टांच्या जोरावर आमदार किसन कथोरे निवडून आले पण प्रत्येक वेळी त्यांच्या पासून मंत्रीपद दूर राहिले होते, परंतु यावेळी असे होऊ नये, संपूर्ण मुरबाड मतदारसंघ व ठाणे जिल्ह्यातील जनता, त्यांच्या वर प्रेम करते, त्यामुळे या महायुतीच्या सरकारने त्यांना मंत्रीपद देऊन जनतेच्या भावनेचा आदर करावा, हे विकासाचे वादळ मुरबाड मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्र विकास कामांनी व्यापून टाकतील अशी आशा वसत शेलवली चे सरपंच रवी भोईर यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आमच्या व जनतेच्या मागणीचा वरीष्ठांनी विचार करावा असेही ते म्हणाले.

## 'शिंदेंचा सस्पेन्स'कायम...

पान ३ वरून ▶▶ घोटाळी. यावेळी मुख्यमंत्र्यांसह तुम्हीही उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार का? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना एकनाथ शिंदेंनी म्हटलं की, देवेंद्र फडणवीसांनी यावर भाष्य केलंय.

**<u>संध्याकाळपर्यंत सांगतो - एकनाथ शिंदे</u>**

दरम्यान देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यानंतर एकनाथ शिंदेंनाही तुम्ही उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार का असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना एकनाथ शिंदेंनी म्हटलं की, अडीच वर्षांपूर्वी याच ठिकाणी मी मुख्यमंत्री व्हावं ही शिफारस देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. आता देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री व्हावं यासाठी मी शिफारस केली आहे. देवेंद्रजींनीही आता सांगितलं..संध्याकाळपर्यंत तुम्हाला सगळं कळेलच... अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदेंनी दिली आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

```
ERROR: invalidaccess
OFFENDING COMMAND: def

STACK:

(     & @ ƒ              ˝    ˝10%! ! @ß   &  )
31
70
1
true
false
```